# विकसित
# महाराष्ट्र २०४७

महाराष्ट्र
शासन



# विहंगावलोकन


## महाराष्ट्राची सद्यस्थिती

महाराष्ट्र हे भारतातील सर्वात मोठी अर्थव्यवस्था असणारे राज्य असून देशाच्या समृद्धीला आकार देण्यात नेहमीच आघाडीवर राहिले आहे. एकीकडे, महाराष्ट्राने उद्योग आणि सेवा क्षेत्रातील मोठमोठ्या उद्योगांचे माहेरघर म्हणून आणि मुंबई–पुणे यांसारख्या सतत विकसित होणाऱ्या जागतिक शहरांच्या रूपाने जलद शहरीकरणाचा वस्तुपाठ घालून आधुनिक गतिशीलतेला मूर्त रूप दिले आहे. तर दुसरीकडे, महाराष्ट्राने कला, संस्कृती, भाषा, सांस्कृतिक ठेवा, चित्रपट आणि जैवविविधतेचा समृद्ध वारसादेखील जोपासला आहे. अजिंठा आणि वेरूळ यांसारखा जागतिक पातळीवर नावाजलेला ठेवा याचे उत्तम उदाहरण आहे. (आकृती १ पहा.)

महाराष्ट्र हे देशातील अनेक आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रांमध्ये आघाडीवर असलेले राज्य आहे:

- ६० वर्षांहून अधिक काळ भारताची सर्वात मोठी अर्थव्यवस्था आणि आर्थिक वर्ष २०२४–२५ मध्ये ३.६ लाख कोटी रुपयांसह सर्वाधिक वस्तू व सेवा कर संकलन
- ४९ टक्के नागरी लोकसंख्या असलेले सर्वात जास्त नागरीकरण झालेले राज्य
- भारताच्या एकूण सेवा क्षेत्राच्या स्थूल मुल्यवृद्धीमध्ये (GVA) सर्वाधिक हिस्सा असणारे आणि वित्तीय सेवांमध्ये २४ टक्के इतका सर्वाधिक हिस्सा असणारे राज्य
- आर्थिक वर्ष २०२४–२५ मध्ये ४७ हजार कोटी रुपयांच्या वार्षिक निर्यातीसह भारतातील सर्वात मोठा कृषी–अन्न निर्यातदार (भारताच्या निर्यातीत ११ टक्के हिस्सा)
- ८३ लाख सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग (MSME) असलेली देशातील सर्वात मोठी सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग परिसंस्था (भारतातील सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांपैकी १३ टक्के)
- अजिंठा–वेरूळ सारख्या ७ वास्तुशिल्पीय ठेव्यांसह युनेस्कोची सर्वाधिक जागतिक वारसास्थळे असलेले राज्य
- ऋणभाराचे स्थूल राज्य उत्पन्नाशी सर्वात कमी प्रमाण (२० टक्क्याहून कमी) असलेल्या देशातील राज्यांपैकी एक

**Exhibit 1: Maharashtra's endowments across regions**




आपल्या भरीव योगदानाच्या आधारे व्हिजन २०४७ मध्ये निर्देशीत केल्यानुसार भारताच्या 'विकसित भारत' प्रवासामध्ये महाराष्ट्र आधारस्तंभ बनण्याचे स्वप्न बाळगून आहे.

## प्रमुख संधी क्षेत्रे

अ. **प्रादेशिक आर्थिक संतुलन सुनिश्चित करणे:** आर्थिक वर्ष २०२३–२४ मध्ये १२ अग्रगण्य जिल्ह्यांचा राज्याच्या स्थूल राज्य उत्पन्नाच्या ७० टक्के हून अधिक हिस्सा आहे. राज्यातील २७ जिल्ह्यांचे दरडोई उत्पन्न राज्याच्या दरडोई उत्पन्नापेक्षा कमी आहे. (आकृती २ पहा). प्रादेशिक स्तरावरील नैसर्गिक साधनसंपत्ती, एक जिल्हा एक उत्पादन धोरण आणि निर्यात क्षमता यांसह समतोल वाढ करण्याची संधी.

Exhibit 2: Disparity in per capita district-level income (2023-24)




ब. उत्पादकता वाढीद्वारे सक्षम समतोल क्षेत्रीय वाढ सुनिश्चित करणे: उद्योग आणि सेवा क्षेत्रातील दरडोई उत्पन्न कृषी क्षेत्रातील दरडोई उत्पन्नापेक्षा अनुक्रमे ४.५ आणि ६.५ पट जास्त आहे. उद्योग/सेवा यांसारख्या उच्च उत्पन्न देणाऱ्या क्षेत्रांकडे वळण्याची संधी तसेच उच्च–मूल्य असलेल्या संधी आणि वाढीच्या कलाशी जुळवून कृषी क्षेत्रामध्ये उत्पन्न वाढवणे आणि त्याचबरोबर उत्पादकता सुधारण्याच्या संधी.

क. औद्योगिक विकासाला गती देणे: आर्थिक वर्ष २०१८–२४ दरम्यान राज्याच्या स्थूल उत्पन्नातील उद्योग क्षेत्राचा वाटा ५–७ टक्केवारी बिंदूनी कमी झाला आहे. प्रक्रियेमध्ये सुलभता आणून, व्यवसायाच्या खर्चात कपात करून आणि कुशल गुणवत्तेची उपलब्धता वाढवून वस्तूनिर्माण क्षेत्र अधिक आकर्षक करण्याची संधी.

ड. रोजगार निर्मिती सुलभ करणे: श्रम शक्ती सहभाग दर (LFPR) सध्याच्या ६४ टक्के२ वरून ८० टक्के पर्यंत वाढवण्यासाठी, दरवर्षी १०–१२ लाख रोजगार निर्मिती करणे आवश्यक आहे. यामध्ये दोन महत्त्वाचे बदल घडणे अपेक्षित आहे: २०४७ पर्यंत महिलांच्या श्रम शक्ती सहभाग दरामध्ये ४४ टक्के वरून ७० टक्के पर्यंत वाढ करून श्रमशक्तीमध्ये सुमारे १२५ लाख महिलांची भर; शेतीपासून बिगर–शेती व्यवसायांकडे संक्रमण. मजबूत पायाभूत सुविधा आणि सामाजिक पाठिंब्यासह महिलांचा सहभाग सुलभ करण्याची आणि पुरेसे पुनःकौशल्य आणि कृषी कामगारांना बिगर कृषी रोजगाराच्या संधीची सुनिश्चिती करणे.

इ. शाश्वत विकास ध्येये (SDG) निर्देशकांच्या कामगिरीत सुधारणा: नीती आयोगाच्या शाश्वत विकास ध्येये निर्देशांकात महाराष्ट्र सध्या देशामध्ये १२ व्या स्थानावर आहे. शाश्वत विकास ध्येयांशी निगडीत सामाजिक–आर्थिक फलश्रुती वृध्दींगत करणे, विषमता दूर करणे आणि सर्व समावेशक मानव विकास साध्य करण्यासाठीच्या प्रयत्नांना गती देण्याची संधी.

तळटीप:

१. स्त्रोत: महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २०२४–२५

२. स्त्रोत: नियतकालिक श्रम बल पाहणी २०२३–२०२४ (१५–५९ वर्षे)

टीप: १५–५९ वर्षे या काम करण्याच्या वयोगटातील लोकसंख्या ६४ टक्के गृहीत धरून सन २०४७ मध्ये श्रम शक्ती सहभाग दर हा ८० टक्के आणि बेरोजगारी दर ३.६ टक्के

# कार्यपद्धती आणि दृष्टीकोन

या कार्यपद्धतीमध्ये कार्यक्षम व कालबद्ध अंमलबजावणीच्या गरजेसह दूरदर्शी आकांक्षांचे संतुलन साधण्यासाठी विविधांगी दृष्टिकोनांचा समावेश आहे. या कार्यपद्धतीमध्ये विद्यमान वस्तुस्थिती आणि आव्हानांवर लक्ष केंद्रित करुन जलदगतीने होणाऱ्या जागतिक आणि तंत्रज्ञानातील बदलांना प्रतिसाद देण्यासाठी नाविन्यपूर्ण विचारसरणीवर भर दिला आहे.

## Voice of citizen

**3.8L**
citizen responses from statewide citizen survey

**7L+**
citizen inputs via multiple department specific surveys

## Identifying themes

**16**
priority themes identified from voice of the citizen

**16**
**sector groups** created across **40+** government departments engaged

## Expert-led stakeholder consultations

**500+**
officers consulted from Secretariat to Block level

**40+**
State, district, department and sectoral strategy reports referenced

**5+**
CM and Deputy CM steering committees conducted

**200+**
experts consulted across private and social sector enterprises

**10+**
brainstorming sessions with NITI Aayog and MITRA experts

**15+**
industry leaders consulted in a Big Ideas workshop


Sector expert workshops



Industry body discussion




CM and Deputy CM steering committee



Focused group discussions



Field visits



Big ideas workshop with industry leaders




## Drafting initiatives

**100** initiatives of Maharashtra **for** **100** years of India's independence

## नागरिकांचा प्रतिसाद

सर्वेक्षणातील नागरिकांची मते आणि ऑडिओ प्रतिसादांचे एआय–आधारित विश्लेषण करण्यात येऊन राज्य आणि जिल्हा पातळीवरील १६ पुनरावर्ती संकल्पना निश्चित करण्यात आल्या. नागरिकांच्या विशिष्ट कल्पना आणि आकांक्षांचा प्रत्येक संकल्पनेमध्ये अंतर्भाव करुन व्हिजनमध्ये समावेश करण्यात आला. लिंक द्वारे नागरिक सर्वेक्षण पूर्ण करण्यात आले.

**Share of respondents (%, N = 3.9L)**



## महाराष्ट्राचे व्हिजन



# १८ संकल्पनांचे व्हिजन

## Growth-driven

### Agriculture, allied sectors and rural
Increase farmers' income with climate resilience and achieve rural-urban quality of life parity

### Industries
Make and design in Maharashtra for the world with over a third of state's GVA coming from industries sector

### Services
Become global leader in new-age finance, frontier technology, media and entertainment

### Tourism
Increase average tourist stay and spend enabled by responsible, safe and zero litter tourism

## Sustainable

### Urban
Make cities slum free, clean, disaster resilient with affordable housing, full employment, easy access to public transport and circularity

### Energy and sustainability
Ensure access to reliable, green and clean power at globally competitive prices, with over a third of the State's land area under green cover

### Water
Provide access to safe water for all, enabled by conservation and reuse

### Transport and logistics
Ensure reliable, safe and seamless multimodal connectivity for passengers and freight

## Inclusive

### Education and skilling
Create global talent hub for inclusive, industry linked education and skilling that fosters learning, innovation and entrepreneurship

### Health
Ensure universal access to affordable and quality healthcare and reduce premature mortality by a third

### Welfare
Ensure socio-economic parity and equal opportunities for marginalized social groups

### Soft power
Attain global recognition for heritage, culture, cinema, language and sports

## Good governance

### Governance
Ensure minimum government and maximum governance

### Technology
Leverage technology for effective governance

### Security
Ensure security, safety and disaster resilience for every citizen in the state

### Finance
Ensure a sustainable fiscal path through prudent fiscal management and alternate financing models

## १६ विषयांचा सारांश

१. **शेती, संलग्न क्षेत्रे आणि ग्रामीण:** महाराष्ट्राला आपले कृषी क्षेत्राचे स्थूल उत्पन्न ५५ अब्ज अमेरिकन डॉलर्सवरून ५०० अब्ज अमेरिकन डॉलर्स (१० टक्के सीएजीआर) पर्यंत वाढवण्याची आकांक्षा आहे, ज्यामुळे ७०० अब्ज अमेरिकन डॉलर्सची गुंतवणूक आकर्षित होईल. हे साधण्यासाठी ७ उपक्रम राबवले जातील – १०–१५ एकात्मिक पीक मूल्य साखळ्या निर्माण करणे, मत्स्यपालन उत्पादन ६ दशलक्ष टन पर्यंत वाढवणे, १००० पशुधन विकास केंद्रे विकसित करणे आणि ग्रामीण भागांना शहरासारख्या नागरी सुविधांनी सुसज्ज करणे.

२. **उद्योगधंदे:** महाराष्ट्राला आपल्या उद्योग क्षेत्राचे स्थूल उत्पन्न १२३ अब्ज अमेरिकन डॉलर्सवरून १,५०० अब्ज अमेरिकन डॉलर्स (११ टक्के सीएजीआर) पर्यंत वाढवण्याची आकांक्षा आहे, ज्यामुळे ४,६०० अब्ज अमेरिकन डॉलर्सची गुंतवणूक आकर्षित होईल. हे साधण्यासाठी ७ उपक्रम राबवले जातील – २० हून अधिक स्वायत्त औद्योगिक टाउनशिप विकसित करणे, २४ उच्च–क्षमता असलेल्या क्षेत्रांसाठी मूल्य साखळी सम्मीलित करणे, मूलगामी नियमनमुक्ती करणे, एमएसएमई, नवोन्मेष आणि शाश्वततेसाठी सक्षम परिसंस्था तयार करणे.

३. **सेवा:** महाराष्ट्राला आपल्या सेवा क्षेत्राचे स्थूल उत्पन्न ३१२ अब्ज अमेरिकन डॉलर वरून ३००० अब्ज अमेरिकन डॉलर पर्यंत (१० टक्के CAGR) वाढवण्याची आकांक्षा आहे, ज्यामुळे ८५०० अब्ज अमेरिकन डॉलरची गुंतवणूक आकर्षित होईल. हे साधण्यासाठी ८ उपक्रम राबवले जातील – मुंबई महानगर प्रदेशाला (MMR) ६०० अब्ज अमेरिकन डॉलर्सहून अधिक किंमतीच्या जागतिक फिनटेक केंद्रामध्ये रुपांतरीत करणे आणि मुंबई/पुणेला ५० अब्ज अमेरिकन डॉलर्सहून अधिक किंमतीच्या मीडिया–टेक–एव्हीजीसी केंद्रामध्ये रूपांतरित करणे, ९–१० ट्रान्सलेशनल–उत्कृष्टता केंद्रे, जीसीसी पार्क आणि डेटा सेंटरसह सक्षम डीप–टेक परीसंस्था उभारुन नवोन्मेश शहर विकसित करणे

४. **पर्यटन:** महाराष्ट्रात येणाऱ्या पर्यटकांची संख्या १६ कोटींवरून ३८ कोटींपेक्षा जास्त वाढवण्याचे उद्दिष्ट आहे. हे साधण्यासाठी ५ उपक्रम राबवले जातील– ५ एंड–टू–एंड पर्यटन परीपथ विकसित करणे, शाश्वत/जबाबदार पर्यटनाला प्रोत्साहन देणे, जागतिक विपणन मोहीम सुरू करणे आणि लक्ष्याभिमुख कार्यपध्दती अनुसरुन पर्यटन स्थळे विकसित करण्यासाठी खाजगी गुंतवणूक आकर्षित करणे

५. **नागरी विकास:** महाराष्ट्रात नागरी लोकसंख्या ७० टक्के प्रक्षेपित असून स्थूल राज्य उत्पन्नात ७५–८० टक्के योगदान असेल. विकास, राहणीमान आणि शाश्वतता सुनिश्चित करण्यासाठी, राज्याकडून ६ उपक्रम हाती घेण्यात येतील – १० पेक्षा अधिक सक्षम प्रादेशिक विकास प्राधिकरणे निर्माण करणे, नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांची आर्थिक स्वायत्तता बळकट करणे, ५० पेक्षा जास्त मिश्र–वापर क्लस्टर्स विकसित करणे आणि ६–७ दशलक्ष परवडणारी घरे बांधणे

६. **ऊर्जा आणि शाश्वतता:** महाराष्ट्राला जागतिक स्तरावर स्पर्धात्मक किंमतीच्या विश्वासार्ह उर्जेचा पुरवठ्याद्वारे तसेच तांत्रिक आणि वाणिज्यिक हानी (एटी अँड सी लॉसेस) ८ टक्के पर्यंत कमी करून ७५ टक्के स्वच्छ ऊर्जा मिश्रण मिळवण्याची आकांक्षा आहे. हे साधण्यासाठी ७ उपक्रम राबवले जातील – नवीकरणीय ऊर्जेमध्ये गुंतवणूक करणे, लवचिकतेसाठी ग्रिडचे आधुनिकीकरण करणे आणि अणुऊर्जेमध्ये आघाडी घेणे. महाराष्ट्र ३३ टक्के हरित आच्छादन साध्य करेल आणि मोठ्या प्रमाणात कार्बनमुक्ती, हरित गतिशीलता आणि परीसंचरण साध्य करेल

७. **पाणी:** ग्रामीण भागात दरडोई प्रति दिवस ५५ लिटरपेक्षा (LPCD) जास्त पाण्याची उपलब्धता, शहरी भागात दरडोई प्रति दिवस १३५ लिटरपेक्षा (LPCD) जास्त पाण्याची उपलब्धता, ६५ टक्के एकूण सिंचित क्षेत्र आणि ८० टक्के पाण्याचा पुनर्वापर व्हावा यासाठी राज्य प्रयत्नशील आहे. हे साधण्यासाठी ५ उपक्रम राबवले जातील – जलसंपत्ती व्यवस्थापनाचे एकात्मिकीकरण, सूक्ष्म सिंचनाद्वारे पाण्याची वापर कार्यक्षमता वाढवणे, साठ्यांचे आधुनिकीकरण करणे, पुरवठा साखळी डिजिटल करणे

८. **वाहतूक:** प्रवासी आणि मालवाहतुकीसाठी अखंड बहुविध संपर्क जाळे स्थापित करण्याचे महाराष्ट्राचे उद्दिष्ट आहे.

हे साधण्यासाठी ७ उपक्रम राबवले जातील – ६००० किमी पेक्षा जास्त लांबीचे द्रुतगतीमार्ग जाळे विकसित करणे, समर्पित मालवाहतूक मार्गिकेचे ४–६ अतिरिक्त संपर्क जोड आणि द्रुतगती लोह मार्गाचे जाळे विकसित करणे. महाराष्ट्र भारताचा २५–३० टक्के व्यापार हाताळण्यासाठी कंटेनरकृत बंदर क्षमता वाढवेल आणि वाहतूक व पुरवठा नियोजन एकात्मिक करेल

९. **शिक्षण आणि कौशल्यविकास:** १०० टक्के मूलभूत साक्षरता आणि संख्याज्ञान, पदवीधरांसाठी ८० टक्के हून अधिक रोजगार मिळवण्याचे महाराष्ट्राचे ध्येय आहे. हे साधण्यासाठी १० उपक्रम राबवले जातील – शालेय शिक्षणासाठी, अध्यापन क्षमता, पायाभूत सुविधा आणि अभ्यासक्रम सुधारणे. उच्च शिक्षणासाठी, स्वयंपूर्ण शैक्षणिक शहरे स्थापन करणे, संशोधनाला गती देणे. कौशल्य विकासासाठी, उद्योगांशी संरेखित डेटावर आधारित कार्यबल नियोजन करणे

१०. **आरोग्य:** महाराष्ट्राचे आयुर्मान ७५ वरून ८५+ पर्यंत वाढणार आहे. हे साधण्यासाठी ६ उपक्रम राबवले जातील – सर्वांना डॉक्टर, औषधे, रोगनिदान, विमा संरक्षणात वाढ, सामुदायिक प्रतिबंधात्मक उपाययोजना आणि असंसर्गजन्य आजारांसाठी सार्वत्रिक तपासणी यांसाठी प्राथमिक, माध्यमिक आणि तृतीयक आरोग्य सुविधांचा विस्तार करणे. राज्य ५ वैद्यकीय शहरांची उभारणी व वैद्यकीय संशोधनासाठी डेटा–स्टॅक निर्माण करेल

११. **समाजकल्याण:** महाराष्ट्रास सर्व वंचित घटकांना सक्षम व उन्नत करण्याची आकांक्षा आहे. हे ६ उपक्रमांद्वारे साध्य केले आहे – दर्जेदार शिक्षण आणि आरोग्याची सार्वत्रिक उपलब्धता सुनिश्चित करणे, सन्माननीय रोजगार प्रदान करणे आणि सुरक्षित गृहनिर्माण आणि नागरी सुविधांचा पुरवठा करणे. महिलांचा श्रमशक्तीतील सहभाग विद्यमान ४४ टक्क्यांवरुन ७० टक्क्यांपर्यंत वाढ करुन महिलांचे सक्षमीकरण करेल आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी आर्थिक आणि सामाजिक एकात्मता वाढवेल

१२. **सॉफ्ट पॉवर:** महाराष्ट्राला १५ हून अधिक युनेस्को मान्यता, ३५ हून अधिक ऑलिंपिक/पॅरालिंपिक पदके आणि त्याच्या संस्कृती, चित्रपट आणि भाषेला जागतिक मान्यता मिळावी अशी आकांक्षा आहे. हे साधण्यासाठी ५ उपक्रम राबवले जातील – संरक्षित स्मारकांना जागतिक ठेवा म्हणून रूपांतरित करणे, कला कॅम्पस स्थापन करून अभिवाद्य कलांना पुनरुज्जीवित करणे, सांस्कृतिक महोत्सव सुरू करणे, फिल्मसिटीजना जागतिक दर्जा मिळवून देणे आणि क्रीडा गुणवत्तेला समृद्ध करणे

१३. **प्रशासन:** महाराष्ट्रामध्ये उच्च नागरिक आणि कामगार समाधान असावे अशी महाराष्ट्राची आकांक्षा आहे. हे ७ उपक्रमांद्वारे साध्य केले आहे – आर्थिक आणि सामाजिक गरजांनुसार राज्य संघटनेची पुनर्रचना करणे, नियुक्ती ते निवृत्ती पर्यंतच्या प्रवासात अमुलाग्र बदल करणे, डिजिटली सक्षम आणि खाजगी क्षेत्राच्या नेतृत्वाखालील सेवा पुरवठ्याद्वारे नागरिक आणि व्यवसाय–केंद्रितता सुधारणे

१४. **तंत्रज्ञान:** महाराष्ट्रात ४ उपक्रमांमुळे तांत्रिक परिवर्तन घडेल– नागरिक, व्यवसाय आणि प्रशासनासाठी वाढीस योग्य नवोन्मेषासाठी खाजगी क्षेत्राद्वारे वापरता येईल अशी एक मजबूत डिजिटल पायाभूत सुविधा (डेटा सेंटर, डेटा लेक) आणि क्षेत्र–विशिष्ट डीपीआय (उदा., कृषी–स्टॅक, आरोग्य नोंदी) तयार करणे


१५. **सुरक्षा:** गुन्हे तपासणी आणि गुन्हे सिध्द होण्याचे प्रमाण सध्याच्या ६० टक्के आणि ४५ टक्के वरून ९५ टक्के पर्यंत वाढवणे आणि आपत्ती प्रतिरोधकता सक्षम करणे असे महाराष्ट्राचे उद्दिष्ट आहे. हे ९ उपक्रमांद्वारे साध्य केले जाईल – तंत्रज्ञानावर आधारित पोलिस व्यवस्था आणि तपास पथकांची नेमणूक, जिल्हा/शहर स्तरावर आपत्कालीन यंत्रणा केंद्रे कार्यन्वयीत करणे आणि पूर्वानुमानी विश्लेषणांचा वापर

१६. **वित्त:** महाराष्ट्राचे २०४७ च्या प्रवासात शाश्वत आर्थिक मार्गाचा अवलंब करण्याचे उद्दिष्ट आहे. हे ३ उपक्रमांद्वारे साध्य केले जाईल – खर्चाचे तर्कसंगतीकरण आणि महसूल प्रणालींचे आधुनिकीकरण, फलश्रुती आधारीत आर्थिक अंदाजपत्रक सुनिश्चित करणे आणि राज्यातील प्रकल्पांसाठी पर्यायी वित्तपुरवठा स्रोतांचा वापर करणे

# महाराष्ट्रासाठीची फलश्रुती

**100** initiatives of Maharashtra **for** **100** years of India's independence

**Maharashtra's nominal GDP (USD Bn)**




**Jobs needed:** 10-12L per year

**Investment needed:** USD 13-14Tn over FY24-48

## Growth-driven

| Urbanization | Per capita income | Merchandise exports | Industrial GDP of 27 emerging districts |
|---|---|---|---|
| **70%** (vs 49%) | **USD 35K** (vs USD 3.8K) | **USD 950Bn** (vs USD 67Bn) | **USD 650Bn** (vs USD 48Bn) |

## Sustainable

| Clean energy generation share | Green cover | Wastewater reuse | Municipal solid waste treated |
|---|---|---|---|
| **75%** (vs 20%) | **33%** (vs 21%) | **80%** (vs 4%) | **100%** (vs 81%) |

## Inclusive

| Female LFPR | People with multi-dimensional poverty | Life expectancy | SDG rank |
|---|---|---|---|
| **70%** (vs 44%) | **0%** (vs 7.8%) | **85 years** (vs 75 years) | **Rank 1** (vs Rank 12) |

## Good governance

| Fiscal deficit | Criminal cases active for >1 year | Crime conviction rate | GINI coefficient |
|---|---|---|---|
| **< 2.5%** (vs 2.8%) | **10%** (vs 62%) | **95%** (vs 45%) | **23%** (vs 30%) |

## महत्वाचे बदल

या व्हिजनचे उद्दिष्ट खालील सुधारणांद्वारे खाजगी क्षेत्राच्या वाढीला आणि गुंतवणुकीला चालना देणे:

- व्यापक नियमनमुक्ती, कामगार आणि जमीन सुधारणा आणि जागतिक स्तरावर स्पर्धात्मक वीज किंमतीमुळे व्यवसाय सुलभतेत आणि खर्चात लक्षणीय सुधारणा
- लवचिक, मिश्र-वापर नियोजनाद्वारे सघनता वाढ आणि संक्रमण-केंद्रित विकासासह जमीन वापर क्षमता वाढवणे
- शासकीय आणि खाजगी क्षेत्राच्या संयुक्त नेतृत्वाखाली उद्योग-संलग्न नवोपक्रमात भारताला जागतिक पातळीवर आघाडीवर आणण्यासाठी मोठ्या प्रमाणात संशोधन आणि विकास
- रोजगार आणि उत्पन्न वाढविण्यासाठी आणि स्वदेशी उद्योग आणि उद्योजकांना जागतिक स्तरावर नेतृत्व करण्यास सक्षम करण्यासाठी उदयोन्मुख आणि उच्च मूल्य क्षेत्रांवर लक्ष केंद्रित करणे

त्याचबरोबर, राज्य पारदर्शक आणि कार्यक्षम सामाजिक गुंतवणूकदेखील सुनिश्चित करेल:

- नागरिकांच्या डिजिटलाइज्ड एकल-पात्रता नोंदणी आणि थेट लाभ हस्तांतरणाचा वापर करून पारदर्शक आणि कार्यक्षम सामाजिक सुरक्षा जाळे
- कल्याणकारी योजना, शिक्षण आणि आरोग्य संस्थांसाठी फलश्रुती आधारित अर्थसंकल्प आणि वित्त पुरवठा
- हरित ऊर्जा, मालाचा पुर्नवापर आणि शाश्वत पद्धतींवर लक्ष केंद्रित करून विविध क्षेत्रांमध्ये हवामान लवचिकतेचे सखोल एकत्रीकरण

वरील सर्व बाबी साध्य करण्याकरिता शासनाची नवकल्पीत भूमिका आणि सेवा वितरण:

- सर्व शासकीय डेटा एकाच डेटा लेकमध्ये एकत्रित करून सर्व विभागांना उपलब्ध असा एक अधिकृत डिजिटल स्त्रोत (Source Of Truth) निर्मिती
- रिअल-टाइम डेटा दृश्यमानतेद्वारे केपीआय-आधारित कामगिरी व्यवस्थापन आणि फलश्रुती-आधारित निर्णय घेण्यासह पुराव्यावर आधारित सक्षम प्रशासन
- एंड-टू-एंड जबाबदारी आणि समन्वित प्रयत्नांसाठी आणि अधिक आंतर-विभागीय समन्वय असावा या दृष्टीने भविष्यास अनुकूल व क्रियाशील विभाग संरचना
- तंत्रज्ञान-सक्षम आणि खाजगी क्षेत्राच्या नेतृत्वाखालील सेवा वितरण, ज्यामध्ये शासन नियामक जबाबदारी पार पाडेल आणि विकासात्मक भूमिकेवर लक्ष केंद्रित करेल

या व्हिजनची प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी, माननीय मुख्यमंत्र्यांच्या नेतृत्वाखाली विकसित 'महाराष्ट्र व्हिजन मॅनेजमेंट युनिट' (VMU) स्थापन केले जाईल. हे व्हिजन राज्याच्या भविष्यातील सर्व धोरणांसाठी आणि प्रयत्नांसाठी मार्गदर्शक दस्तावेज म्हणून काम करेल याची सुनिश्चिती VMU द्वारे केली जाईल.

# महाराष्ट्राच्या १०० उपक्रमांची माहिती

## प्रगतीशील

### कृषी, संलग्न क्षेत्रे आणि ग्रामीण

१. १०-१५ उच्च-मूल्याच्या पिकांसाठी एकात्मिक मूल्य साखळी तयार करणे.

२. सागरी आणि मत्स्य उत्पादन १० पट वाढवून ६ दशलक्ष टन करण्याचे अभियान सुरू करणे.

३. शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवण्यासाठी दुग्धव्यवसाय आणि पशुपालनाला चालना देणे.

४. एआय-आधारित कृषी-तंत्रज्ञान आणि संशोधन उपक्रमांना गती देणे

५. मजबूत एफपीओ आणि कंत्राटी शेतीद्वारे शेतकऱ्यांच्या समृद्धीचे दारे खुली करणे.

६. शेतीची शाश्वतता आणि पोषणाची पर्याप्तता वाढवणे.

७. २८,००० ग्रामपंचायतींना विविध उपजीविका, आधुनिक सुविधा आणि सुधारित नागरी सेवांसह स्वावलंबी समृद्ध केंद्रांमध्ये रूपांतरित करणे.

### उद्योगधंदे

८. इन्व्हेस्ट महाराष्ट्र' द्वारे खाजगी गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी २० हून अधिक पूर्णपणे स्वायत्त औद्योगिक टाउनशिप तयार करणे.

९. २४ फोकस क्षेत्रांसाठी मूल्य साखळी एकात्मिक करणे.

१०. समर्पित आयुक्तालयाद्वारे एमएसएमईना बळकटी देणे; क्रेडिट आणि निर्यात वाढवणे.

११. 'उदयोन्मुख जिल्ह्यांचा औद्योगिक विकास' अभियान राबवणे.

१२. २४ फोकस क्षेत्रांसाठी भारताचे संशोधन आणि विकासाचे प्रमुख केंद्र होणे.

१३. सर्व क्षेत्रांमध्ये शाश्वत उत्पादन आणि डीकार्बोनायझेशनला चालना देणे.

१४. स्वतंत्र नियमनमुक्ती आयोग सुरू करणे.

### सेवा

१५. मुंबई महानगर प्रदेशाला (MMR) ६०० अब्ज डॉलर्सपेक्षा जास्त किमतीचे जागतिक फिनटेक आणि वित्तीय सेवा केंद्र बनवणे

१६. मीडिया-टेक, AVGC या क्षेत्रांसाठी ५० अब्ज डॉलर्सपेक्षा अधिक किमतीचे जागतिक केंद्र म्हणून मुंबई-पुणे स्थापित करणे.

१७. ३ दशलक्षाहून अधिक लोकांना रोजगार देऊन धोरणात्मक मूल्य साखळी स्थापन करण्यासाठी जीसीसीचा वापर करणे

१८. ५० हजारांहून अधिक पेटंटसह भारतातील सर्वात मोठी डीप-टेक इकोसिस्टम तयार करणे

१९. हरित ऊर्जेद्वारे चालणारी ३०-४० गिगावॅट डेटा सेंटर क्षमता निर्माण करणे

२०. डिजिटल साधनांचा अवलंब आणि निर्यातीद्वारे ५ दशलक्षाहून अधिक किरकोळ (रिटेल) आणि व्यापार एमएसएमई वाढविणे

२१. महाराष्ट्राच्या उद्योजकता परिसंस्थेला सक्षम बनवणे आणि ५ लाखाहून अधिक ग्रामीण उद्योजक तयार करणे.

२२. सेवा क्षेत्र आणि आघाडीच्या तंत्रज्ञानासाठी स्वतंत्र आयुक्तालय स्थापन करणे.

### पर्यटन

२३. पाच प्राधान्य पर्यटन परिपथांवर लक्ष केंद्रित करून आठ पर्यटन संकल्पना विकसित करणे.

२४. संपूर्ण पर्यटन परिपथ विकासासाठी परिपथ व्यवस्थापन संघटना (CMOs) स्थापन करणे.

२५. पर्यटनाच्या पायाभूत सुविधांमध्ये ७५ टक्के पेक्षा जास्त खाजगी गुंतवणूक टिकवून ठेवण्यासाठी धोरणे आणि संस्था संरेखित करणे.

२६. राज्याची एक प्रसिद्ध पर्यटन क्षेत्र अशी ओळख निर्माण करण्यासाठी जागतिक ब्रँडिंग मोहीम सुरू करणे

२७. प्रवासाचे डिजिटायझेशन करणे आणि पर्यटन डेटा परिसंस्था विकसित करणे

## शाश्वतत

**नागरी**

२८. एकात्मिक शहरी विकासासाठी संपूर्ण निधी आराखड्यासह दहा पेक्षा जास्त सक्षम प्रादेशिक विकास प्राधिकरणे (RDAs) आणि स्वायत्त नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांची निर्मिती करणे आणि त्यांचे संस्थात्मकीकरण करणे.

२९. प्रदेशनिहाय नागरी आर्थिक प्रेरक घटकांवर आधारित ५० पेक्षा जास्त सुनियोजित, मिश्र-वापराचे नागरी क्लस्टर तयार करणे.

३०. संक्रमण-केंद्रित विकास, क्लस्टर आणि झोपडपट्टी पुनर्विकास करून शहरी केंद्रांचे पद्धतशीर घनीकरण (डेन्सीफिकेशन) सक्षम करणे.

३१. ६-७ दशलक्ष परवडणाऱ्या घरांचे बांधकाम करणे, तसेच त्यातील २०-३० टक्के घरे भाडेतत्वावर उपलब्ध करून देणे.

३२. ११००-१२०० किमी लांबीची मेट्रो/सार्वजनिक रेल्वे वाहतूक व्यवस्था आणि ५०-६० हजार स्वच्छ ऊर्जा बसेस सुरू करणे.

३३. राज्यव्यापी शहरी हरित अभियान राबवणे.

**ऊर्जा आणि शाश्वतता**

३४. स्वच्छ ऊर्जेचा अंगिकार करण्यात आशियातील अग्रणी म्हणून महाराष्ट्राची ओळख तयार करणे.

३५. संपन्न उपयुक्ततांसह लवचिक, विश्वासार्ह आणि कार्यक्षम असे भविष्यातील ग्रिड तयार करणे.

३६. महाराष्ट्राच्या प्रगत अणुऊर्जा मोहिमेचा शुभारंभ करणे.

३७. महाराष्ट्राला जगातील आघाडीचे हरित रेणू (मॉलिक्यूल) निर्यात केंद्र म्हणून विकसित करणे.

३८. महाराष्ट्राला स्वच्छ ऊर्जेचा जागतिक नवोन्मेष निर्यातदार म्हणून स्थापित करणे.

३९. किमान ३३ टक्के हरित आच्छादनासह हवामान अनुकूल वन परिसंस्था निर्माण करणे.

४०. हरित गतिशीलता, जैविक इंधन आणि पुनर्वापरामुळे निव्वळ शून्यतेकडे (नेट-झिरो) जाण्याचा मार्ग आखणे.

**पाणी**

४१. सर्व घरांना नळाद्वारे पिण्याचे पाणी उपलब्ध करून देणे.

४२. सूक्ष्म सिंचन आणि पाणी साठवण संरचनांचे आधुनिकीकरण करून सिंचनाची व्याप्ती वाढवणे.

४३. पाण्याची मागणी आणि पुरवठा यामध्ये समातोल साधण्यासाठी सर्व नदीखोऱ्यांमधील पाण्याची समान उपलब्धता सुनिश्चित करणे.

४४. महाराष्ट्रातील सर्व क्षेत्रांमध्ये पाण्याचे पुनर्चक्रीकरण (रिसायकलिंग) आणि पुनर्वापर करणे.

४५. योग्य मूल्य आणि डिजिटल प्रशासनाद्वारे स्वयंपूर्ण पाणी सुविधा निर्माण करणे.

**वाहतूक आणि लॉजिस्टिक्स**

४६. ६००० किमी पेक्षा जास्त एक्सप्रेसवेचे जाळे तयार करणे.

४७. अमृतकाल रस्ते विकासाच्या माध्यमातून महाराष्ट्रातील रस्त्यांचा कायापालट करणे

४८. ग्रामीण भागात २७ हजार स्वच्छ ऊर्जेवर चालणाऱ्या बसेस तैनात करणे आणि बसच्या पायाभूत सुविधांचे आधुनिकीकरण करणे.

४९. भारतातील ३५० दशलक्षहून अधिक प्रवाशांची वाहतूक करणारी हवाई परिसंस्था म्हणून महाराष्ट्राला विकसित करणे.

५०. समर्पित मालवाहतूक मार्गिका आणि हाय/सेमी-हाय स्पीड रेल्वे नेटवर्कचा विस्तार करणे.

५१. कंटेनराइज्ड बंदर अर्थव्यवस्थेद्वारे महाराष्ट्राला भारताचे २.५-३ ट्रिलियन डॉलर्सचे व्यापारी प्रवेशद्वार बनवणे.

५२. एकात्मिक वाहतूक आणि लॉजिस्टिक्ससाठी एकीकृत प्राधिकरण स्थापन करणे.

## सर्वसमावेशक

### शिक्षण आणि कौशल्यविकास

५३. शासकीय शाळांमधील अध्ययन फलनिष्पत्ती सुधारणे.

५४. राज्यातील शासकीय विद्यापीठांच्या परिवर्तनाद्वारे समावेशक, उच्च दर्जाचे उच्च शिक्षण प्रदान करणे.

५५. ८–१० विद्यापीठे आणि संस्थांमध्ये उद्योग एकात्मिक संशोधन आणि नवोन्मेष उत्कृष्टता केंद्रे स्थापन करणे.

५६. भारतीय आणि आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांना आकर्षित करण्यासाठी ८–१० शैक्षणिक शहरे (एज्यु–सिटीज) बांधणे

५७. रोजगार बाजारपेठ बुद्धिमत्तेवर आधारित मागणीनुसार कौशल्य आणि शिक्षण प्रदान करणे

५८. महाराष्ट्रातील युवकांना उद्योग–केंद्रित आणि फलश्रुती केंद्रित कौशल्य आणि शिक्षण देऊन सुसज्ज करणे.

५९. अनुकूल कौशल्ये प्रदान करून उपेक्षित गट, महिला आणि अपंग व्यक्तींना सक्षम बनवणे.

६०. महाराष्ट्राच्या उद्योजकीय आणि औद्योगिक क्षेत्रात नवोन्मेषाला चालना देणे.

६१. G2G सक्षम भागीदारीद्वारे जागतिक मनुष्यबळ पुरवठा साखळीत महाराष्ट्राचे भारतातील योगदान सर्वात जास्त बनवणे.

६२. शिक्षण ते रोजगार पाइपलाइनमध्ये फलश्रुतीवर आधारित निधी कार्यान्वित करणे.

### आरोग्य

६३. शेवटच्या स्तरापर्यंत आरोग्य सेवा उपलब्ध असणाऱ्या सर्वसमावेशक आयुष्मान आरोग्य मंदिरांद्वारे प्राथमिक आरोग्य क्षेत्रामध्ये मध्ये परिवर्तन करणे

६४. समुदाय–चालित प्रतिबंधात्मक आणि प्रोत्साहनात्मक उपाययोजनांना उत्तेजन देणे, असंसर्गजन्य रोग, संसर्गजन्य रोग आणि पुनरुत्पादक आरोग्यासाठी तपासण्या आणि निदान वाढवणे.

६५. प्रत्येक नागरिकासाठी समान, सुलभ आणि उच्च दर्जाची तृतीयक आरोग्यसेवा सुनिश्चित करणे

६६. वैयक्तिक खर्च कमी करण्यासाठी परवडणाऱ्या दरात उच्च दर्जाच्या आरोग्यसेवांची उपलब्धता सुनिश्चित करणे.

६७. विशेष तज्ञ सेवा आणि संशोधनाच्या परिसंस्था म्हणून ४–५ वैद्यकीय शहरे (मेडी–सिटीज) स्थापन करणे.

६८. पुराव्यावर आधारित धोरण तयार करण्यास मदत करणारी क्रॅडल–टू–ग्रेव्ह (जन्मापासून मृत्युपर्यंत) आरोग्य तंत्रज्ञान मोहीम सुरू करणे

### समाज कल्याण

६९. समाज आणि अर्थव्यवस्था यामध्ये महिलांचे संपूर्ण क्षमतेने योगदान सुनिश्चित करणे.

७०. सर्व मुलांसाठी सुरक्षित आणि संगोपनशील वातावरण सुनिश्चित करणे

७१. आदिवासी नागरिकांना गरिबीतून बाहेर काढण्यासाठी आणि समृद्ध उपजीविका साध्य करण्यासाठी सक्षम बनवणे.

७२. अनुसूचित जाती, इतर मागासवर्गीय, विमुक्त आणि भटक्या जाती आणि इतर अल्पसंख्याकांच्या समावेशक विकासाला चालना देणे आणि जातींमधील दरी भरून काढणे.

७३. अपंग व्यक्तींसाठी समावेशक भविष्य सक्षम करणे.

७४. ज्येष्ठ नागरिकांसाठी निरोगी, सुरक्षित आणि सन्माननीय जीवनाची सुनिश्चित करणे

### सॉफ्ट पॉवर

७५. स्मार्ट तंत्रज्ञान आणि उपजीविकेच्या संधींसह राज्यातील सर्व संरक्षित स्मारकांचे जागतिक ठेव्यांमध्ये रूपांतर करणे.

७६. महाराष्ट्राच्या जीवित कलांना सांस्कृतिक ग्रिडसह नवचैतन्य आणणे ज्यायोगे मराठी कला, संगीत, नृत्य आणि नाट्य जागतिक स्तरावर ओळखले जाईल.

७७. फिल्मसिटीजना जागतिक दर्जाचे बनवणे आणि आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव आयोजित करणे.

७८. संस्कृती आणि ज्ञानासाठी मराठीला आधुनिक, समावेशक भाषा म्हणून सक्षम बनवणे.

७९. २०४७ पर्यंत महाराष्ट्रासाठी १५ ऑलिंपिक आणि २० पॅरालिंपिक पदके मिळवण्यासाठी 'मिशन लक्ष्यवेध'ला गती देणे.

## सुशासन

**प्रशासन**

८०. भविष्यासाठी योग्य सरकारी कार्यप्रणाली, रचना आणि कर्मचारी संख्या सुनिश्चित करणे.

८१. कर्मचाऱ्यांसाठी सर्वोत्तम दर्जाची नियुक्ती ते निवृत्ती सुनिश्चित करणे.

८२. लक्ष्य क्षमता बांधणीसह केपीआय-संबंधित फलश्रुतीसाठी शासकीय कर्मचाऱ्यांना सुसज्ज करणे आणि मोजमाप करणे.

८३. जन्मापासून मृत्यूपर्यंत आवश्यक सर्व नागरी सेवांचे १०० टक्के डिजिटलायझेशन करणे.

८४. सहभागी प्रशासनासाठी द्वि-मार्गी नागरिक सहभाग संस्थात्मकीकरण करणे.

८५. उदयोन्मुख प्राधान्यांशी सुसंगत अशा धोरणांचे आणि अनुपालनांचे नियमनमुक्तीकरण आणि डिजिटलायझेशन करणे

**तंत्रज्ञान**

८६. एकात्मिक आणि सायबर-सुरक्षित डेटा लेक आणि टेक-स्टॅक तयार करणे

८७. राज्यासाठी प्रगत तंत्रज्ञानाच्या पायाभूत सुविधा उभारणे

८८. क्षेत्र-विशिष्ट डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा निर्माण करणे

**सुरक्षा**

८९. सुधारित फौजदारी कायदा संहितांच्या अंमलबजावणीला गती देणे.

९०. महाराष्ट्राच्या सुरक्षा आणि न्याय व्यवस्थेत संरचनात्मक बदलांचे संस्थात्मकीकरण करणे.

९१. महाराष्ट्रात घडणाऱ्या गुन्ह्यांचे प्रभावीपणे व्यवस्थापन करण्यासाठी समर्पित अभियान राबवणे.

९२. एक उच्चप्रेरित, कामगिरीवर आधारित, भविष्यासाठी सज्ज आणि विश्वासार्ह पोलिस दल तयार करणे.

९३. स्मार्ट पोलिसिंग आणि न्यायदानासाठी तंत्रज्ञानाचा वापर वाढवणे.

९४. महाराष्ट्राला आपत्ती प्रतिरोधक बनविण्यासाठी प्रतिसाद क्षमता बळकट करणे.

९५. रिअल-टाइम, सर्वसमावेशक पूर्वसूचना आणि जोखीम बुद्धिमत्ता यांच्या साह्याने महाराष्ट्राची आपत्ती सज्जता वाढवणे.

९६. लोकवस्त्या, मालमत्ता, महत्त्वाच्या पायाभूत सुविधा आणि सेवांचे संरक्षण करणे.

९७. शाश्वततेसाठी विकासात्मक कार्यक्रमात आपत्ती लवचिकता हा मुख्य विषय ठेवणे.

**वित्त**

९८. कामगिरी संलग्न खर्च आणि पुनर्रचना (रिडिझाइन) केलेले महसूल मॉडेल वापरून आर्थिक राजकोषीय स्पेस तयार करणे.

९९. पर्यायी भांडवलाची उपलब्धता वाढवणे आणि मालमत्ता मुद्रीकरण धोरण राबवणे.

१००. सर्व भागधारकांमध्ये क्रयशक्ती समता (पीपीपी) आणि वित्त नियोजन क्षमतेसाठी मजबूत संस्थात्मक चौकट तयार करणे.

महाराष्ट्र शासन